# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

निवडणूक तात्काळ

क्रमांक : बीआयई(G&T)-२०१८/प्र.क्र. ४६१/का. ३३
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ५ जून, २०१८.

प्रति,

१) विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ
२) विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ
३) विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, मुंबई शिक्षक मतदारसंघ
४) विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, मुंबई पदवीधर मतदारसंघ

विषय : महाराष्ट्र विधान परिषदेची पदवीधर/शिक्षक द्विवार्षिक निवडणुक, २०१८ मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमितिक रजा मंजूर करण्याबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोगाने दि. २४ मे, २०१८ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये राज्यातील दोन पदवीधर व दोन शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक घोषित केली आहे. विद्यमान सदस्यांचा कालावधी दि. ७ जुलै, २०१८ रोजी समाप्त होत असून आयोगाच्या कार्यक्रमानुसार सोमवार दि. २५ जून, २०१८ रोजी मतदान तर गुरुवार दि. २८ जून, २०१८ रोजी मतमोजणी होणार आहे, हे आपणांस विदीत आहे.

२. या निवडणूकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर/शिक्षक मतदारसंघातील मतदारांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्या दिवसाची विशेष नैमितिक रजा देणे आवश्यक आहे. यासंदर्भातील राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३ जून, २०११ च्या शासन निर्णयाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. त्यानुसार या निवडणूकीच्या मतदारांना विशेष नैमितिक रजा मंजूर करण्यात यावी. सदरची रजा ही कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या नैमितिक रजेव्यतिरिक्त असणार आहे.

३. उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन आपल्या स्तरावरुन याबाबीस स्थानिक वृतपत्राद्वारे तसेच, दुरदर्शन व आकाशवाणी इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी, अशी विनंती आहे.

**आपली,**

शुभा बोरकर

**( शुभा बोरकर )**
**अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**

प्रत,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी / उप जिल्हाधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर/ मुंबई उपनगर /रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ठाणे/पालघर/नाशिक/धुळे/

विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या तसेच शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकाच्या दिवशी संबंधित मतदारसंघाचे मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - विनैर २०११/प्र.क्र.१४६/का-२९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक- २३ जून, २०११

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानपरिषदेतील काही सदस्य पदवीधर मतदारसंघातून तसेच शिक्षक मतदारसंघातून निर्वाचित करण्यात येतात. पदवीधर मतदारसंघ/शिक्षक मतदारसंघामध्ये मतदार असलेल्या कर्मचा-यांना संबंधित मतदारासंघाच्या निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रजा मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात सर्वकष विचार करून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघातील तसेच शिक्षक मतदारसंघातील मतदार असलेल्या कर्मचा-यांना संबंधित मतदारासंघाच्या निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात यावी. सदर रजा ही कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजे व्यतिरिक्त असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भा.र.गावित )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
मंत्रालयीन विभागांतील सर्व सचिव, प्रधान सचिव व अपर मुख्य सचिव,

उप सचिव (का.३३) सामान्य प्रशासन विभाग तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी मंत्रालय मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय,, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई/नागपूर,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र २, नागपूर,
उपमहालेखापाल, भविष्यनिर्वाह निधी कक्ष, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
* मुख्य लेखापाल, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई,
* व्यवस्थापक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई,
* सचिव, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका.
* सर्व राज्यांचे मुख्य सचिव,
* भारत सरकारची सर्व मंत्रालये, नवी दिल्ली,
* महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई,
* महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई,
* समाहरक, सीमा शुल्क, मुंबई,
* आयकर आयुक्त, मुंबई,
* समाहरक, केंद्रीय उत्पादन शुल्क, मुंबई,
* प्रादेशिक पारपत्र अधिकारी, वरळी, मुंबई - ४०० ०२०,
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
* संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली,
* व्यवस्थापक, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय. टॉवर, कफ परेड, मुंबई-४००००५
* सचिव, भारत निवडणूक आयोग, निर्वाचन सदन, अशोक सदन, अशोक रस्ता, नवी दिल्ली, ११० ००१,
* आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, १ला मजला, वीर नरीमन रोड, मुंबई - ४०० ०२०
* सचिव, इंडियन बँक्स असोसिएशन, स्टेडियम हाऊस, ६ वा मजला, वीर नरीमन रोड, मुंबई-४०० ०२०,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आवश्यक ते प्रसिध्दीपत्रक निर्गमित करावे, तसेच आकाशवाणी व दूरदर्शनद्वारे प्रसिध्दी द्यावी)
निवड नस्ती / सामान्य प्रशासन विभाग-२९

* पत्राद्वारे

( भा.र.गावित )
अवर सचिव ,महाराष्ट्र शासन